# मिरा भाईंदर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# प्रेसनोट

❖ **सार्वत्रिक निवडणूक 2025-26 च्या अंमलबजावणीसाठी निवडणूक निर्णय अधिकारी (Returning Officer – RO) व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी (Assistant Returning Officer – ARO) यांची आढावा बैठक**

दिनांक 18 डिसेंबर 2025 रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक 2025-26 च्या अनुषंगाने निवडणूक प्रक्रियेची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी मा. आयुक्त तथा निवडणूक अधिकारी राधाबिनोद अ. शर्मा (भा.प्र.से.) यांच्या उपस्थितीत सर्व निवडणूक निर्णय अधिकारी (Returning Officer – RO) व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी (Assistant Returning Officer – ARO), पोलिस उपायुक्त अशोक वीरकर यांची सविस्तर आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीस अतिरिक्त आयुक्त डॉ. संभाजी पानपट्टे, उपायुक्त (मुख्यालय) डॉ. सचिन बांगर, नगरसचिव दिनेश कानगुडे, पोलिस उपायुक्त अशोक वीरकर, नियुक्त RO व ARO अधिकारी, पोलिस प्रशासनाचे तसेच संबंधित विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात होणाऱ्या सार्वत्रिक निवडणूक 2025-26 च्या पार्श्वभूमीवर निवडणूक प्रक्रिया सुसूत्र, पारदर्शक आणि कायदेशीर नियमांचे काटेकोर पालन करून पार पाडण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी (RO) व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी (ARO) यांची अधिकृत नियुक्ती करण्यात आली आहे. यामध्ये एकूण सात (7) निवडणूक निर्णय अधिकारी व त्यांच्याशी संलग्न सहाय्यक निर्णय अधिकारी नियुक्त करण्यात आले असून, त्यांच्यावर निवडणूक प्रक्रियेच्या सर्व टप्प्यांची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

या बैठकीदरम्यान मा. निवडणूक अधिकारी यांनी सर्व नियुक्त अधिकाऱ्यांना सार्वत्रिक निवडणूक 2025-26 च्या अंमलबजावणीसाठी आवश्यक असलेली सर्व पूर्वतयारी वेळेत पूर्ण करण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या. यामध्ये मतदार केंद्रांची प्रत्यक्ष पाहणी, मतदान केंद्रांवरील मूलभूत सुविधा, कर्मचारी नियोजन, निवडणूक साहित्याचे व्यवस्थापन, प्रशिक्षण कार्यक्रमांची अंमलबजावणी तसेच सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेण्याबाबत निर्देश देण्यात आले. तसेच सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी (ARO) यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रात कार्यरत असलेल्या विविध निवडणूक समित्या जसे की VST (व्हिडिओ सर्व्हेलन्स टीम), FST (फ्लाइंग स्क्वॉड टीम), SST (स्टॅटिक सर्व्हेलन्स टीम) व VVT (व्हिडिओ व्ह्यूइंग टीम) यांच्या कामकाजावर प्रभावी नियंत्रण ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या. निवडणूक आचारसंहितेचे कोणत्याही प्रकारे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घेण्याबाबत सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना निर्देश देण्यात आले. महानगरपालिका प्रशासन निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार निवडणूक प्रक्रिया शांततेत, पारदर्शकतेने आणि नियोजित वेळापत्रकानुसार पार पाडण्यासाठी पूर्णतः सज्ज असून, नागरिकांचा लोकशाही प्रक्रियेवरील विश्वास अधिक दृढ व्हावा यासाठी सर्व संबंधित यंत्रणांच्या समन्वयातून कामकाज करण्यात येत असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.